# रयत शिक्षण संस्था, सातारा
# पाहिजेत
## (शै. वर्ष २०१५-२०१६)

रयत शिक्षण संस्थेमार्फत ठाणे,पालघर, नाशिक व नंदुरबार जिल्ह्यातील दुर्गम आदिवासी भागात चालविल्या जात असलेल्या आदिवासी आश्रमशाळामध्ये सन २०१५-२०१६ मध्ये भरावयाच्या खालील पदांसाठी खालीलप्रमाणे प्रवर्गनिहाय व अर्हताप्राप्त पात्र उमेदवारांकडून सरळ सेवा भरतीद्वारे विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. न. | पदनाम | एकूण रिक्त पदे | अ. जा. | अ. ज. | एन.टी. | | | | इमाव | वि मा प्र | खुले |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अ | ब | क | ड | | | |
| **अ. प्राथमिक विभाग** | | | | | | | | | | | |
| १. | प्राथमिक शिक्षण सेवक | ०४ | ०२ | ०१ | - | - | - | - | - | ०१ | - |
| २. | अधीक्षक (पुरुष) | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | ०१ |
| ३. | अधीक्षिका (स्त्री) | ०८ | ०१ | ०१ | ०१ | - | - | - | ०१ | - | ०४ |
| ४. | स्वयंपाकी | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ | - | - |
| ५. | पहारेकरी | ०८ | ०१ | ०१ | ०१ | - | - | - | ०१ | - | ०४ |
| **ब. माध्यमिक विभाग** | | | | | | | | | | | |
| १. | माध्यमिक शिक्षण सेवक | ०५ | - | ०१ | - | - | - | - | - | ०१ | ०३ |
| २. | लेखनिक | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | ०१ |
| ३. | स्वयंपाकी | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | ०१ |
| ४. | कामाठी | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ | - | - |

जाहिरातीमधील पदांची शैक्षणिक अर्हता व विषयवार पदसंख्येचा अधिक तपशील रयत शिक्षण संस्थेच्या **http://www.rayatshikshan.edu** व **http://rayat2016.erecruitment.co.in/** या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. इच्छुक उमेदवारांनी नोकरी अर्ज भरणेसाठी **http://rayat2016.erecruitment.co.in/** या संकेत स्थळाचा वापर करावा. हे संकेत स्थळ अर्ज भरणेसाठी दि.११/०४/२०१६ अखेर सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील.

स्थळ :- सातारा
तारीख :- २२/०३/२०१६

**सचिव,**
**रयत शिक्षण संस्था, सातारा.**

# रयत शिक्षण संस्था, सातारा

## आश्रमशाळा विभाग

## पाहिजेत

## (शै. वर्ष २०१५-२०१६)

रयत शिक्षण संस्थेमार्फत ठाणे,पालघर, नाशिक व नंदुरबार जिल्ह्यातील दुर्गम आदिवासी भागात चालविल्या जात असलेल्या आदिवासी आश्रमशाळामध्ये (शासन निर्णय शालेय विभाग क्र. एसएसएन १०९९/(३४०/९९) माशी-२ दि. १३ ऑक्टोबर २०००, आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र.अआशा २०१३/प्र.क्र.२००/का.११ दि.०३ ऑक्टोबर २०१३ नुसार शिक्षण सेवक योजनेअंतर्गत व महाराष्ट्र शासन राजपत्र आदिवासी विकास विभाग क्र.आस्था १०९९/प्र.क्र. ८९/का. दि.१० जानेवारी २००६, आदिवासी विकास विभागाच्या दि.२६/०२/२०१४ व दि.१८/१०/२०१३ च्या शासन आदेशानुसार) सन २०१५-२०१६ मध्ये भरावयाच्या शिक्षण सेवक व शिक्षकेत्तर पदांसाठी खालीलप्रमाणे प्रवर्गनिहाय व अर्हताप्राप्त पात्र उमेदवारांकडून सरळ सेवा भरतीद्वारे विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. न. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | एकूण रिक्त पदे | अ. जा. | अ. ज. | एन.टी. | | | | इमाव | वि मा प्र | खुले |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | अ | ब | क | ड | | | |
| **अ. प्राथमिक विभाग** | | | | | | | | | | | | |
| १. | प्राथमिक शिक्षण सेवक | एच.एस्सी.डी.एड./डी.टी.एड. | ०४ | ०२ | ०१ | - | - | - | - | - | ०१ | - |
| २. | अधीक्षक (पुरुष) | पदवीधर, बी. एस डब्लू | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | ०१ |
| ३. | अधीक्षिका (स्त्री) | पदवीधर, बी. एस डब्लू | ०८ | ०१ | ०१ | ०१ | - | - | - | ०१ | - | ०४ |
| ४. | स्वयंपाकी | इ.४ थी पास | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ | - | - |
| ५. | पहारेकरी | इ.४ थी पास | ०८ | ०१ | ०१ | ०१ | - | - | - | ०१ | - | ०४ |
| **ब. माध्यमिक विभाग** | | | | | | | | | | | | |
| १. | माध्यमिक शिक्षण सेवक | बी.ए.,बी.एड.-२ पदे<br>बी.एस्सी.बी.एड.-३ पदे | ०५ | - | ०१ | - | - | - | - | - | ०१ | ०३ |
| २. | लेखनिक | **$** | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | ०१ |
| ३. | स्वयंपाकी | इ. ४ थी पास | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | ०१ |
| ४. | कामाठी | इ. ४ थी पास | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ | - | - |

$ लेखनिक पदासाठी शैक्षणिक अर्हता खालील प्रमाणे आवश्यक आहे. -
पदवीधर, टंकलेखन इंग्रजी ४० श.प्र.मी., मराठी ३० श.प्र.मी. आवश्यक आहे, तसेच डी.ओ.ई.ए.सी.सी. किंवा एम.एस.सी.आय.टी. संगणक परीक्षा प्रमाणपत्र धारक.

अ) **<u>नियम व अटी : -</u>**

१. जाहिरातीत नमूद केलेल्या पदांसाठी आवश्यक ती अर्हता व अनुभव धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांनीच अर्ज करावा.

२. उमेदवाराने खोट्या माहितीच्या आधारे केलेला अर्ज रद्दबातल ठरविण्यात येईल व सदर उमेदवारावर कायदेशीर कारवाई केली जाईल.

३. शिक्षण सेवक योजनेंतर्गत शासन व आदिवासी विकास विभाग यांनी निर्गमित केलेले व यापुढे निर्गमित केले जाणारे आदेश उमेदवारांवर बंधनकारक राहतील.

४. नॉन – क्रिमीलेअर सर्टिफिकेट (SC व ST वगळून) सर्व उमेदवारांनी सादर करणे आवश्यक आहे.

५. मागास प्रवर्गातील उमेदवारांनी जातीच्या दाखल्याबरोबरच जात पडताळणी समितीने वैध ठरविलेले “जाती वैधता प्रमाणपत्र” सादर करणे आवश्यक आहे. तथापि अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर मागासवर्गीय प्रवर्गातील जाती वैधता प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांसाठी शासन निर्णय क्र. सीबीसी-१०/२०१०/प्रक्र.४७/मावक-५, दि.२६/०३/२०१० अन्वये जाती वैधता प्रमाणपत्र तीन महिन्याच्या आत सादर करण्याची जबाबदारी सर्वस्वी सदर उमेदवाराची



पान.नं.२ वर

राहील.तीन महिन्याच्या आत उमेदवाराने जाती वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याची निवड रद्द होईल. त्यासाठी संस्था स्वतंत्र पत्रव्यवहार करणार नाही, याची नोंद घ्यावी.

६. मागासवर्गीय उमेदवारांची गुणवत्तेवर निवड झाल्यास त्याची निवड ही खुल्या प्रवर्गात झाल्याचे समजण्यात येईल. त्याबाबतचे शासन निर्णय संबंधीत उमेदवारास लागू होतील.

७. शिक्षण सेवक भरती प्रक्रिया शासन निर्णय क्र.एस.एस.एन.१००७/(३६/०७)माशी-२ दि.६ फेब्रु.२००६ नुसार केली जाईल.

८. खुल्या प्रवर्गातून अर्ज करणा-या उमेदवारास खुल्या प्रवर्गाचे सर्व नियम लागू राहतील.

९. लेखनिक, अधिक्षक व शिक्षण सेवक पदांसाठी संगणक वापराबाबतचे विहित प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१०.प्राथमिक शिक्षकाकरिता शिक्षक पात्रता परीक्षा (**TET**) शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता

आदिवासी विकास विभाग**,** शासन निर्णय क्र.अआशा-२०१३/प्र.क्र.२००/का११ दि.०३ ऑक्टोबर २०१३ नुसार अनिवार्य राहील.

११. उमेदवाराचे वय दि.३१/०१/२०१६ रोजी १८ वर्षे पूर्ण असावे.वयाची कमाल मर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३३ वर्षे, मागासवर्गीयांसाठी ३८ वर्षे व अपंगासाठी ४५ वर्षे असेल.

१२. अपंग प्रवर्गासाठी ३ टक्के आरक्षण राहील. अपंग प्रवर्गाच्या उमेदवाराजवळ ४०% पेक्षा कमी अपंगत्व नसल्याचे सक्षम अधिकारी यांचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे

१३. शासन निर्णय क्र.न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१९-अ, दि. २७/१०/२००९ मधील तरतुदीनुसार प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणा-या व्यक्तींना ५% आरक्षण राहील.

## ब) अर्ज करण्याची पद्धत : -

१. उमेदवारांनी जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.

२. उमेदवार ज्या पदासाठी ऑनलाईन अर्ज भरणार आहे,त्या पदाची शै.पात्रता जाहिरातीमध्ये काळजीपूर्वक वाचावी.

३. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी सर्व आवश्यक कागदपत्रे आणि स्वत:चा अलीकडील काळातील पासपोर्ट साईज फोटो व सहीची Scanned Image स्वत:जवळ असण्याची खात्री करावी. फॉर्म भरतेवेळी आपल्याला फोटो व सहीची प्रतिमा upload करावी लागेल.

४. ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी Apply Online ह्या लिंकवर क्लिक करून अर्ज भरण्यास सुरुवात करावी. आपल्यास अर्ज करावयाचे पद निवडा. एक-एक रकाना/पायरी पूर्ण करत आपणास विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर Yes/No पैकी योग्य पर्याय निवडा, तुम्ही दिलेल्या उत्तराचे आधारे संगणक प्रणाली तुमची प्राथमिक पात्रता तपासेल.

५. शिक्षण सेवक पदांसाठी शासनाच्या प्राथमिक पात्रता चाचणीत **(TET)** पात्र उमेदवाराने ज्या पदासाठी अर्ज भरावयाचा आहे ते पद/विभाग निवडावे आणि आवश्यक माहिती भरावी.

६. आवश्यक माहिती भरल्यानंतर संगणक प्रणाली तुमचा लॉगीन आय.डी., पासवर्ड आणि स्टेट बँकेचे चलन स्क्रीनवर सादर करेल, तसेच तुम्ही पुरविलेल्या मोबाईल क्रमांकावर SMS करेल. (कृपया आपण आपला मोबाईल क्रमांक अचूक टाकावा तसेच तो कायम ठेवावा, जेणेकरून आपल्याला Login I.D. आणि Password ची माहिती आपल्या मोबाईल क्रमांकावर SMS द्वारे प्राप्त होईल. हा लॉगीन आय.डी.म्हणजेच तुमचा अर्ज क्रमांक असेल)

७. भरती प्रक्रीया शुल्क बँकेत भरण्यासाठी “Print My Login Challan details” ह्या बटनांवर क्लिक करून चलनाची प्रिंट काढावी.

८. चलन प्राप्त केल्यानंतर, दुस-या दिवशी नजीकच्या भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये जावे व चलनावर दर्शविलेले शुल्क बँकेत जमा करावे. बँक शुल्क जमा केल्याची पोहोच देईल. कृपया चलनावर दर्शविलेल्या अंतिम तारखेच्या आत हे शुल्क भरा. एकदा भरलेले शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.

९.भारतीय स्टेट बँकेत चलनाद्वारे शुल्क भरल्यानंतर उर्वरित ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रीया "Fill Application Form" ह्या लिंकवर क्लिक करून पूर्ण करावी.

अर्जामध्ये खालील प्रमाणे माहिती भरून, अर्ज पूर्ण करणे आवश्यक आहे. त्याशिवाय आपला अर्ज पूर्ण होणार नाही.

- वैयक्तिक माहिती
- आरक्षणाबद्दलची माहिती
- शैक्षणिक माहिती
- फोटो आणि सही अपलोड
- कामाचा अनुभव
- इतर आवश्यक माहिती
- रोजगार व स्वयंरोजगार नोंदणी प्रमाणपत्र छायांकित प्रत. (लागू असल्यास)
- बँक चलन माहिती

१०. भरती प्रक्रिया शुल्क खुल्या प्रवर्गासाठी रुपये ४००/- फक्त व मागासवर्गीय प्रवर्गासाठी रुपये ३००/- फक्त राहील.

११. उमेदवाराने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प / जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केली असली तरीही ऑनलाईन अर्ज भरणे बंधनकारक आहे.

१२. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार, पात्र उमेदवारानीच अर्ज करावेत. इतर उमेदवारांनी अर्ज करू नयेत. सदरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच त्यासाठी कोणताही स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

वरील सर्व माहिती अर्जामध्ये भरावी. ती भरल्याशिवाय आपला अर्ज पूर्ण होणार नाही. माहिती भरल्यानंतर अर्जाची प्रिंट काढून आपल्या माहितीसाठी जतन करून ठेवावी.येथे तुमची अर्ज करण्याची प्रक्रिया पूर्ण होते. ऑनलाईन अर्ज पूर्ण भरल्यानंतर **अर्जाची प्रत** संबंधीत रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय, आदिवासी विकास कार्यालय किंवा MKCL किंवा रयत शिक्षण संस्थेकडे **पाठविण्याची आवश्यकता नाही.** लेखी परीक्षेचे ओळख-पत्र **परीक्षेपूर्वी तुमच्या लॉगीनमध्ये व वेबसाईटवर उपलब्ध राहील. ह्यासाठी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. अर्जदाराने नियमितपणे वेबसाईट तपासणे अत्यंत गरजेचे आहे.**

**क) निवड पद्धती :-**

१. प्राथमिक / माध्यमिक आश्रमशाळा विभागाकडील शिक्षक,अधीक्षक व लेखनिक या पदाकरिता आलेल्या अर्जातून पात्र ठरलेल्या उमेदवारांची वस्तुनिष्ठ स्वरुपाची ऑनलाईन परीक्षा रयत शिक्षण संस्था व **Maharashtra Knowledge Corporation Limited (MKCL)** यांच्या अधिकृत प्रशिक्षण केंद्रावर (**ALC-Authorised Learning Centers**) घेण्यात येईल. त्याचा अभ्यासक्रम खालीलप्रमाणे राहील.

**अ) प्राथमिक शिक्षण सेवक** - इ.१ली ते इ.७ वी चा अभ्यासक्रम, डी. टी.एड. अभ्यासक्रम, सामान्य ज्ञान, संगणक ज्ञान व रयत शिक्षण संस्थेविषयी माहिती यावर आधारित अशी एकूण ६० गुणांची परीक्षा राहील.

**ब) माध्यमिक शिक्षण सेवक** -

**१) बी.ए.बी.एड. गुणवत्ताधारक -** इ.८ वी ते इ.१० वी च्या भाषा, सामाजिकशास्त्रे विषय, बी.एड. चा अभ्यासक्रम तसेच सामान्य ज्ञान, संगणक ज्ञान, व रयत शिक्षण संस्थेविषयी माहिती यावर आधारित अशी एकूण ६० गुणांची परीक्षा राहील.

**२) बी.एस्सी.बी.एड. गुणवत्ताधारक -** इ.८ वी ते इ.१० वी चे गणित व विज्ञान विषय, बी.एड चा अभ्यासक्रम तसेच सामान्य ज्ञान, संगणक ज्ञान, व रयत शिक्षण संस्थेविषयी माहिती यावर आधारित अशी एकूण ६० गुणांची परीक्षा राहील.

**क) अधिक्षक पदासाठी** - बी.एस.डब्लू चा अभ्यासक्रम, सामान्य ज्ञान, संगणक ज्ञान, व रयत शिक्षण संस्थेविषयी माहिती यावर आधारीत अशी एकूण ६० गुणांची परीक्षा राहिल.

**ड) <u>लेखनिक पदासाठी</u> -** सामान्य ज्ञान, सामान्य गणित, इंग्रजी ज्ञान, संगणक ज्ञान (इंग्रजी, मराठी टंकलेखन) व रयत शिक्षण संस्थेची माहिती यावर आधारित अशी एकूण ६० गुणांची परीक्षा राहील.

**ई) स्वयंपाकी, कामाठी व पहारेकरी –** या पदांसाठी ऑनलाईन परीक्षा घेतली जाणार नसून, शैक्षणिक अर्हता व अनुभव विचारात घेऊन पात्र उमेदवारास मुलाखतीस बोलाविले जाईल.

१. संगणकावरील ऑनलाईन परीक्षेचे वेळापत्रक http://rayat2016.erecruitment.co.in/ या संकेतस्थळावर लवकरच उपलब्ध होईल.

२. आश्रमशाळा विभागाकडील पदांची उपलब्ध संख्या व समांतर आरक्षण विचारात घेता गुणवत्तेच्या आधारे मौखिक परीक्षेचे पत्र http://rayat2016.erecruitment.co.in/ या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

३. सर्व उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेकरता केंद्रावर स्वखर्चाने यावे लागेल. याकरिता कोणत्याही प्रकारच्या प्रवास खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येणार नाही.

४. संस्थेच्या कार्यक्षेत्रातील शाखांमध्ये उमेदवारांची **ऑनलाईन परीक्षांची ठिकाणे, मुलाखतीची ठिकाणे ठरविली जातील.** याबाबत कोणत्याही उमेदवारास दावा सांगता येणार नाही.

५. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सेवक पदांची उपलब्ध संख्या व समांतर आरक्षण विचारात घेता ऑनलाईन टेस्ट मधील गुणवत्तेच्या आधारे समान गुण धारण करणा-या त्या त्या संवर्ग / प्रवर्गाच्या उमेदवारामध्ये ते धारण करीत असलेले बी.ए./बी.एस्सी./एच.एस.सी. चे गुण क्रमागत प्राधान्याने विचारात घेतले जातील यातही समान गुण असल्यास एस.एस.सी गुणांचा विचार करावा, यामध्येही समान गुण आलेस जन्म तारखेचा विचार करून मौखिक परीक्षेसाठी बोलविण्यात येणा-या उमेदवारांची यादी मर्यादित केली जाईल. अशी यादी वरील संकेत स्थळावर (website) प्रसिद्ध केली जाईल. याबाबत उमेदवारास कोणताही दावा सांगता येणार नाही. मौखिक परीक्षेचे पत्र, निवड पद्धती वरील क्र. १ व २ नुसार उपलब्ध होईल.

६. शिक्षकेत्तर पदांची उपलब्ध संख्या व समांतर आरक्षण विचारात घेता ऑनलाईन टेस्ट मधील गुणवत्तेच्या आधारे निवडलेल्या किंवा समान गुण धारण करणा-या त्या त्या संवर्ग / प्रवर्गाच्या उमेदवारामध्ये ते धारण करीत असलेले एस.एस.सी., बी.एस.डब्लु याप्रमाणे गुणांचा विचार होईल, यामध्ये समान गुण आलेस जन्म तारखेचा विचार करून मौखिक परीक्षेसाठी बोलविण्यात येणा-या उमेदवारांची यादी मर्यादित केली जाईल. अशी यादी वरील संकेत स्थळावर (website) प्रसिद्ध केली जाईल. याबाबत उमेदवारास कोणताही दावा सांगता येणार नाही.

७. मागासवर्गीय उमेदवारांनी खुल्या प्रवर्गाअंतर्गत अर्ज केला असल्यास तो नमूद केलेला विकल्प बदलता येणार नाही. संबंधित मागासवर्गीय उमेदवारास सर्व बाबी खुल्या प्रवर्गाचा उमेदवार म्हणून समजण्यात येईल. याबाबत शासनाचे सर्व निकष लागू राहतील.

८. भरती प्रक्रियेत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रचार / हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवाराचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

९. उमेदवारास मुलाखतीस बोलविल्यास स्वखर्चाने यावे लागेल.

१०. निवड केलेल्या उमेदवारांची विहित अर्हता / अनुभव धारण चुकीचे आढळल्यास व त्याचे पूर्वीचे चारित्र्य गैरवर्तणूकीचे आढळल्यास त्याची उमेदवारी / नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. तसेच अशा उमेदवाराची नियुक्ती झाल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

११. उमेदवारांच्या अंतिम निवडीचे अधिकार संस्थेच्या निवड समितीला राहतील.

अ) निवड झालेल्या उमेदवारास आरक्षण व रिक्त जागांच्या उपलब्धतेनुसार संस्थेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही आश्रमशाळेत नियुक्ती दिली जाईल.

ब) नियुक्ती दिलेल्या कर्मचा-याची सेवा रयत शिक्षण संस्थेच्या कोणत्याही आश्रमशाळेत बदलीस पात्र राहील.

१२. उमेदवारास मुलाखतीच्यावेळी खालील प्रमाणपत्रांच्या (सक्षम अधिका-यांनी प्रमाणित केलेल्या) प्रती सादर कराव्या लागतील. तसेच मुळ प्रमाणपत्रे सादर करावी लागतील.



पान.नं.५ वर

१. जन्म तारखेचा दाखला- शाळा सोडल्याचा दाखला/ एस.एस.सी. बोर्डाचे प्रमाणपत्र.
२. शैक्षणिक अर्हता गुणपत्रके व प्रमाणपत्र.
३. मागासवर्गीय जातीचे प्रमाणपत्र व जाती दावा वैधता प्रमाणपत्र.
४.दिलेल्या पत्याच्या पुष्टयर्थ रहिवासी प्रमाणपत्र (आधार कार्ड/रेशन कार्ड / ग्रामपंचायत / तहसिलदार/स्थानिक स्वराज्य संस्था यांचा दाखला /फोटो असलेले ओळखपत्र)
५. प्रकल्पग्रस्त असल्यास तसे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र.
६. अपंग असल्यास तसे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र.
७. उन्नत व प्रगत **(Creamy layer)** गटात मोडत नसल्याचे ( **Non Creamy layer**)प्रमाणपत्र.

**ड) अर्ज भरण्याची विहित मुदत :**

१. ऑनलाईन अर्ज उपलब्ध होण्याचा दिनांक :२२/०३/२०१६ ते ०५/०४/२०१६
२. ऑनलाईन अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनाक : ०७/०४/२०१६ वेळ : साय.६.०० वाजेपर्यंत.
३. ज्या उमेदवारांनी बँकेमध्ये दि.०७/०४/२०१६ पर्यंत भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी उरलेला ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी :- दिनांक : ११/०४/२०१६ रोजी साय.६.०० वाजेपर्यंत.

**जाहिरातीचा तपशील अधिक माहितीसाठी रयत शिक्षण संस्थेच्या http://www.rayatshikshan.edu या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी अर्ज http://rayat2016.erecruitment.co.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

स्थळ :- सातारा
तारीख :- २२/०३/२०१६

**सचिव,**
**रयत शिक्षण संस्था, सातारा.**